ISSN NO.2320-4915

मराठी साहित्य संशोधन पत्रिका - त्रैमासिक

# अभिनव वाग्विलास

संपादक
डॉ.चं.वि.जोशी

कार्यकारी संपादक
प्रा.गोकुळ शिखरे

सहसंपादक
डॉ. अशोक शिंदे
श्री.चंद्रकांत पालवे

वर्ष 3 रे / अंक २-३ एप्रिल-सप्टेंबर-२०१५





नोंदणी - MAHAMAR 41094/ 13/1/2012-
TC GOVERNMENT OF INDIA
( मराठी साहित्य संशोधन पत्रिका - त्रैमासिक )
(National Institute of Science Communitation And Information Resources, New Delhi-110067)
**कार्यालयाचा पत्ता -** संपादक । प्रा. डॉ.चं.वि.जोशी
'अभिनव वाग्विलास ' ( त्रैमासिक )
१०,सारथी,सरस्वती कॉलनी/पोस्ट कॉलनीमागे /
पाईपलाईन रोड, सावेडी जि. अहमदनगर
पीन-४१४००३ ( महाराष्ट्र )
दूरध्वनी- ०२४१-२४२२३१८

प्रकाशिका । प्रा. सुहासिनी जोशी
मुद्रक । सिध्दीगणेश ऑफसेट, केडगांव, अ.नगर

संपर्क - भ्रमणध्वनी -१. संपादक - डॉ.चं.वि.जोशी
९३२५४५९२२९

सहसंपादक
१. डॉ.अशोक शिंदे - ९८८१९४०४४२ ३.
२. श्री. चंद्रकात पालवे - ९३७२४१५५३५
मुखपृष्ठ - ऋतुपर्ण जोशी, अ.नगर
या अंकाची किंमत - ६० रूपये मात्र

**सूचना -**

**या अंकात व्यक्त झालेले विचार त्या त्या शोधनिबंधकांचे आहेत. त्यांच्याशी संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही.तसेच शोधनिबंधातील मजकुराचा व सदर्भाचा संपादक, प्रकाशकाचा काहीही संबंध नाही.ती जबाबदारी सर्वस्वी शोधनिबंध लेखकाचीच आहे.**



## ।। अनुक्रमणिका ।।

संपादकीय / २

१.ग्रेस यांच्या निसर्ग कवितेतील झाडे व फुले - डॉ.चं.वि.जोशी / ३

2 ग्रामीण साहित्यात पडलेले बोलींचे प्रतिबिंब – रेवणनाथ पवार /१३

३. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात भर टाकणारी अकलूज येथील लावणी - - प्रा. डॉ.दत्ता बारबोले / २५

४. उत्तम कांबळे यांच्या कथेतील वैचारिकता - एक शोध - प्रा. गोकुळ शिखरे /२२

५.१९८०नंतरची ग्रामीण प्रेमकविता - डॉ.वसंत सपकाळ / ३०

६. स्त्री आत्मचरित्रे:मराठी साहित्यातील समृध्द दालन- कु. उज्ज्वला राजगुडे/ ३४

७. 'धनगरी' साहित्याचे दर्शन - प्रा. डॉ. निवृत्ती विनायक मिसाळ / ३९

८. श्री क्षेत्र ढोकेश्वर - प्रा.श्री.आल्हाट श्रीकांत गोपीनाथ / ४७

९. संतश्रेष्ठ श्री नामदेव कार्य आणि कर्तृत्व - प्रा.श्री.आल्हाट श्रीकांत गोपीनाथ / ५१

१०. संघर्षमय जीवनाचं समृध्द चित्रण -'हाणला कोयता,--- डॉ.उज्ज्वला भोर / ५४

११. मला हे सांगायला हवंय् -- डॉ. अशोक शिंदे / ५८

१२.पुणे जिल्ह्यातील लोकदेवता, देवी नाहात्म व यात्रा-जत्रा - उत्सव - - प्रा. ज्योती माने /५९

१३.मध्ययुगीन कवितेतील सुभाषितवजा वचने - डॉ.विठ्ठल जंबाले /६७

## ११. मला हे सांगायला हवंय् --

**- डॉ. अशोक शिंदे**

डॉ.चं.वि.जोशी यांनी दि.७/७/२०१५रोजी अहमदनगर महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे विभाग प्रमुख म्हणून सूत्रे हाती घेतली. याबद्दल चं.वि.चे मनापासून अभिनंदन ! १९८२ साली मी त्याला नेवासे येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात मराठी शिकवायला होतो. भिल्ल समाजाचा लक्ष्मण माळी व चं.वि. हे दोघेच नियमित येणारे विद्यार्थी.माळी आदिवासी तर चं.वि. भिक्षुक ब्राह्मण . दोघेही हलाखीत शिकणारे. हुशार. चं.वि. लिहिणारा, नाटकात अभिनय करणारा. सर्वांना हवाहवासा वाटणारा. शिक्षकांनाही आवडणारा. तो दहावीत असतानाच त्याचे ९ वर्षे घरात अंध राहिलेले वडील निवर्तलेले. आई अडाणी पण कडक, कष्टाळू, कर्तव्यदक्ष. भाऊ व हा भिक्षुकी करणारा. सायकललाही महाग. त्याला मित्र-मैत्रिणी भरपूर. पसायदान भित्तीपत्रकात तो नेहमी लिहायचा. गावकरी कथास्पर्धा गाजवायचा. सार्वमत पुरवणीमधूनही लिहायचा.बी.ए.च्या दुसऱ्या वर्षाला असतानाच त्याच्या पारी कादंबरीला म.रा.शासनाचे अनुदान मिळाले होते व पुण्याच्या नीलकंठ प्रकाशनाने ती १९८४ साली प्रकाशित केली होती. मान. यशवंतराव गडाख साहेबांचे पुढाकाराने लक्ष्मण माने यांच्या हस्ते तिचे समारंभपूर्वक प्रकाशनही झाले होते. चं.वि. एम.ए. ला बोरावके कॉलेजला गेला. १९८७ साली विद्यापीठात ७७ / गुण मिळवून पहिलाही आला.मग त्याने मागे वळून पाहिले नाही. तो सतत माझ्या संपर्कात असायचा. कथा-कविता काहीना काही छापून येई. चर्चा होई. सतत न थकता लिहिता राहिला. कोणताही अभिमान नाही, गर्व नाही, कोणाशी शत्रुत्त्व नाही. हसणे व हसविणे हे व्रत घेतलेल्या या माझ्या विद्यार्थ्याला नेहमी संघर्षच करावा लागला. तरीही चेहऱ्यावरील हसू मावळू दिले नाही. २८ वर्ष वरिष्ठ महाविद्यालयात अध्यापन करणारा चं.वि. आज नामांकित अहमदनगर महाविद्यालयाच्या मराठी विभागाचा प्रमुख झाला. यासाठीही त्याला अकारण एका छळाला सामोरे जावेच लागले. हा घाव शांतपणे पेलून तो पाय रोवून उभाच राहिला. २४ ग्रंथ प्रकाशित असलेला, राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेला, स्वत:ची प्रकाशन संस्था चालविणारा, कोणतेही वाईट व्यसन नसलेला हा माझा विद्यार्थी. मला याचा फार अभिमान ! आता त्याच्या त्याने १९८४-२०१० मध्ये लिहून ठेवलेल्या ५५ पुस्तकांचे डी.टी.पी चे काम चालू आहे. क्षणनक्षण मोलाचा मानून सतत कार्यमग्न राहणाऱ्या चं.वि.चे अभिनंदन !



## १३ मध्ययुगीन कवितेतील सुभाषितवजा वचने

डॉ.विठ्ठल जंबाले

प्राचीन मराठी वाङमयातील संत–पंत–तंत कवितेतील काही काव्य ओळींना सुभाषितवजा वचनाचे रूप लाभले आहे. ते लोकजीवनात म्हणींप्रमाणे उच्चारणात येतात. अगदी स्वयंस्फूर्त व स्वाभाविक सहजपणे वापरले जातात. वापरकर्त्यास त्याचा निर्माता कोण, कोणत्या लेखक–कवींच्या लेखनातील कोणत्या काव्यरचनेतील ओळ म्हणीरूपाने आपण वापरत आहोत. ऐकत आहोत. याची माहिती असते असे नाही. तसेच ते कोणत्या कवीच्या कवितेतील बोधवाक्य–सुभाषितवजा वचन आहे, हे जाणून घेण्याची आवश्यकता नसते. उलट मागील कित्येक वर्षांपासून अशी वचने लोकजीवनामध्ये मिसळलेली असतात. भाषाव्यवहाराचा अविभाज्य भाग बनलेली असतात.

व्याख्या : 'अगदी मार्मिकपणे कमीत कमी शब्दात विदारक सत्य प्रकट करणारे वचन म्हणजे म्हण'.

'सुभाषितवजा गर्भित अर्थ प्रकट करणारे वचन म्हणजे म्हणी'.

'पद्यमयशैली छोटेखानी आकार ठसकेबाज अनुभव यांचे लोकविचारातून कथन करणारे वाक्य किंवा शब्दबंध म्हणजे म्हणी'.

अशा प्रकारे म्हणींच्या रचनेतून मानवी जीवनातील अथवा निसर्गादील सत्य कमीतकमी शब्दात ठासून सांगितलेले असते. म्हणी स्वरूप वचने अगदी लहान क्षेत्रातून निघून व्यापकक्षेत्राला लागू पडणारे असते. त्यातून सर्वसामान्य जीवनाचे विदारक सत्य गोळीबंद पदबंधातून पद्यमय शैलीत प्रकट होत असतो.

म्हणींच्या रचनेत ताल, लय, ठसकेबाजपणा असतो. **Proverbs are the daughters of daily experience.** असे म्हणींचे वर्णन केलेले आहे. तिलाच **People's**

**Voice** असे म्हणतात. आशय व अभिव्यक्ती या दोन्हींच्या दृष्टीने लोकमनावर संस्कार करणारे सुबोध वाक्य जगभरात सर्वत्र आढळते. त्याचे महत्त्व वाङमयात व मानवी जीवनामध्ये अनन्यसाधारण असे आहे. लोक अनुभव सूत्रबध्दपणे कथन करताना म्हणींचे निर्मिती होते. त्यातील अनुभव सत्य–वास्तव असल्यामुळे लोकमनाचे उदबोधन होउन सुसंस्कार घडतात.

लोकमनावर म्हणींचा प्रभाव मौखिकतेतून होत असते. कियाकर्म, निसर्गप्रतिमा, विनोदनिर्मिती, टिंगळ–टवाळी करण्यासाठी म्हणींचा उपयोग केला जातो. पारंपरिक जीवनात आचार–विचार, रूढी–प्रथा, मानवी मूल्ये, धर्मभावना, प्राणिमात्राचे प्रतिकात्मक संदर्भ इत्यादी भिन्न–आशय व विषयातून मानवी मनाचा नितळ आविष्कार म्हणींच्या रूपाने आविष्कृत झालेला आढळतो.

म्हणीतून प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे संस्कार होतात. त्यातून सुसंपन्न, संस्कारित, सुजाण लोकमनाची जडण–घडण होते. लोकजीवनाला मार्गदर्शक तत्त्व मिळतात. ते जीवन केवळ माणसापुरते मर्यादित न राहता संपूर्ण सश्ष्टीचा अंतर्भाव होतो. सामाजिक जीवनात म्हणीतून प्रत्येक विचार प्रभावित झालेला असतो. समाजाला एकसंध करण्याचे कार्य म्हणीतून केले जाते.

भारतात म्हणींची परंपरा अति प्राचीन आहे. प्राचीन काळी संस्कृतात ज्याला सुक्त किंवा सुक्ती म्हटले जात असे. त्यालाच इंग्रजी मध्ये पारिभाषिक शब्द **Maxim** असा आहे. सुक्त या शब्दाचा अर्थ देवता संवादक काव्य हा होय. पुढे पुढे ऋषिप्रणित असा वैदिक अर्थ बदलून चांगले बोललेले ते शब्द उक्ती व सुक्ती . कालांतराने ऋषिवाक्य वेगळे होउन ही सुक्ती लौकिक उक्ती बनली व त्यातून वेगळी परंपरा निर्माण झाली. हळूहळू पुढे पंडितांच्या कडून सुक्तीच्या ऐवजी सुभाषित असा शब्द वापरण्यात आला संस्कशतमध्ये सुभाषित व सुक्ती यांच्या प्रशंसेतून लोकउक्ती असा उल्लेख आढळतो.

संत कवितेतील संत तुकारामांच्या अभंगातील काही ओळी लोकांच्या तोंडून सहजपणे उच्चारल्या जातात. काही काव्यओळीतून मनुष्य स्वभावातील गुण–दोष. दाखवून समाजात सामंजस्य निर्माण करण्याचा आणि समाज सुखी, संपन्न, आनंदी व्हावा म्हणून आशय व्यक्त करणारे आहेत . मानवी जीवनात विसंगती नसून सुसंगती असावी, या हेतूने तुकोबांच्या अभंगातील



काही ओळीमध्ये आशयगर्भता सूचकतेने प्रकट करण्यासाठी वापरली जातात. ती प्रतिनिधकपणे पुढीलप्रमाणे .

प्रचीन मराठी कविततील म्हणीसादृष्य सुभषितवजा वचनातून अभिव्यक्त होणारे लोकमनाचे विशेष खालील चरणांच्या आधारे नोंदविण्यात येत आहेत .

१ .कानडीने केला म–हाटी भ्रतार ! एकाचे उत्तर एका न ये २ .लोभ्या काळांतरीची आस ! बोटे मोजी दिवस मास ३ . पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती सर्व भावे पती ध्यानी मनी ४ . कन्या सासुराशी जाय , मागे परतुनि पाहे ५.चुकलिया माये, बाळ हुरूहुरू पाहे ६ .जीवना वेगळी मासळी ७ .बाळेवीण मायेर क्षणभर न राहे ८ . आपुले मरण पाहिले म्या डोळा ९ . ठेविले अनंते तैसेचि रहावे ! चित्ती असू दयावे समाधान १० .धर्म रक्षावयासाठी करणे आटी आम्हासी ११ .आम्ही वैकुंठवासी आलो याची कारणासी १२ .हेचि दान देगा देवा ! तुझा विसर न व्हावा १३ .लहानपण देगा देवा ! मुंगी साखरेचा रवा १४ . जे का रंजले – गांजले ! त्यासी म्हणे जो आपुले १५ .आवा चालली पंढरपुरा ! वेशीपासूनि आली घरा १श६ . गाढव शश्ंगारिले कोडे ! काही केल्या नव्हे घोडे १७ .जोडोनिया धन उत्तम व्यवहारे १८ . दया तिचे नाव भुतांचे पालन ! आणिक निर्दालन कंटकांचे १९ . जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत २० .ऐकमेका सहदय करू ! अवघे धरफ सुपंथ २१ .जे जे आपणासी ठावे ! ते ते इतराशी सांगावे २२ . शहाणे करून सोडावे ! सकळजन २३ .जगी सर्व सुखी असा कोण आहे . विचारा मना तूच शोधूनि पाहे २४ . घार हिंडे आकाशी चित्त तिचे पिल्लापाशी २५ . आता विश्वात्मके देवे २६ . बाईल पैशाची पैशाची ! कधी नव्हे रे पुरूषाची २६ .चंदनाची चोळी माझे अंग अंग पोळी २७ . वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे २८ .महापुरे येती झाडे जाती तिथे लव्हाळे वाचती इ .

समारोप व निष्कर्ष : १.छोटया पदबंधातून गर्भित अर्थ प्रकटीकरण होते . २. लाक्षणिक अर्थाने मानवी जीवनाला उपयुक्त अर्थ प्रकट करणारी शब्दयोजना कवितेमधील चरणामध्ये दिसते . ३. बोलणा–याचे प्रभावी संभाषण होण्यासाठी उपयुक्तता असते. ४. श्रोत्यावर विशेष प्रभाव टाकण्यासाठी उपयोग केला जातो . ५. सहज स्वाभाविकपणे माणसे अशी वचने नित्य व्यवहारात उपयोजितात. ६. तुकारामांच्या अनेक वचनांना सुभाषितांचे रूप लाभले आहे. ७.

तुकोबांच्या अभंगातील चरणामधून त्रिकालबाधित सत्य प्रकट करणारी वचने चिरंतन ठरली आहे. ८. समाजिक परिस्थितीत तत्सम पर्यावरण असताना ती वचने समांतर आशय प्रकट करणारी आहेत. ९. निसर्ग आणि मानव याचे अनुबंध मांडणारी आहे. १० एखादा चरण जीवनाचे प्रगाढ असे तत्त्वज्ञान सांगून जातो. अभंगातील अशा चरणाना लोकभाषेचे स्वरूप लाभते आणि त्यातून लोकव्यवहाराला उपयुक्त ठरणारे तत्त्वज्ञान कथन केलेले असते. ११. लोकांच्या दैनंदिन समास्या, भावना आणि विचाराची मांडणी सुबोधपणे झालेली असते.

संदर्भ :


१. सकल संत अभंगगाथा

२. संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या अभंगाची गाथा श्री तुकाराम महाराज संस्थान, श्रीक्षेत्र देहू पुनरावश्त्ती, शुक्रवार २९मार्च २०१३

३. प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास : ल. रा. नसिराबादकर

४. भारतीय संस्कश्ती कोश – पं. महादेवशास्त्री जोशी

५. लोकायन – डॉ. स.रा. गाडगीळ

६. लोकसाहित्याची रूपरेखा – दुर्गाबाई भागवत



डॉ. विठ्ठल जंबाले

प्रमुख, मराठी विभाग,

देगलूर महाविद्यालय, देगलूर २०१६